नि. फौ. खटला क्र. <u>**२०४/२०२१**</u>
सरकार विरूद्ध गोविंदराम व इतर
**निशाणी २९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : नविन दिलीप जेसवाणी
वय : १९ वर्षे,
धंदा : शिक्षण,
राहणार : सिंधी कॉलनी, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी सर्व आरोपींना ओळखतो. ते आमच्या शेजारी राहतात. फिर्यादी दिलीप माझे वडिल आहेत. हेमा जेसवाणी माझी आई आहे. माझ्या आजीचे नांव द्रौपदीबाई जेसवाणी असुन ती अलीकडे मयत झाली आहे. अंदाजे चार वर्षांपुर्वी घटना घडली. सदर वेळी मी बाहेर खेळायला गेलेलो होतो. असे घडले नाही की, माझे आई—वडिलांना शिवीगाळ झाली व मला गच्ची धरून झापड मारण्यात आली होती.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/०७/२०२१ रोजी दुपारी ३—४ वाजेदरम्यान माझे घरासमोर आरोपी क्र. २ दिनेश याने माझी गच्ची पकडुन मला झापडा मारल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ हा फावडा घेउन माझे वडिलांच्या अंगावर धाउन आला व सदर वेळी माझी आजी व माझी आई माझे वडिलांना वाचवण्यासाठी आली असता सदर

आरोपींनी त्यांनादेखील लोटलाट केली व अश्लील शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला 'घर के बाहर निकल आज तुझे खल्लास कर देंगे अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेवेळी मी त्याठिकाणी हजर होतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत फिर्यादीची न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झालेली आहे हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत न्यायालयाबाहेर फिर्यादीची तडजोड झाल्यामुळे फिर्यादीच्या सांगण्यावरून आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — सर्व आरोपींतर्फे ॲड. श्री. एफ. ए. काझी यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १९.०५.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.